# आई हत्तिणीच्या निमित्ताने

***आनंद शिंदे***

हत्ती अभ्यासक, संस्थापक अध्यक्ष
ट्रंक कॉल द वाईल्ड लाईफ फाउंडेशन
shindeanand79@gmail.com

Sambhāṣaṇ Volume 1 : Issue 03, July 2020 | संभाषण वर्ष ०१ : अंक ०३, जुलै २०२०

केरळमधल्या हत्तिणीने वाहत्या नदीमध्ये आपला देह ठेवला. न बोलता कृतीतून तिने हत्ती कसा असतो, हे सहज दाखवून दिलं. जी गोष्ट कित्येक वर्षे अभ्यासक सांगण्याचा प्रयत्न करत होते, ती गोष्ट नकळत तिच्या कृतीमुळे जनसामान्यांच्या भावनेतून पुढे आली. इतक्या वर्षांत पहिल्यांदाच हत्तीच्या संवेदनशीलतेला जनसामान्यांचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा बघायला मिळाला. एक अभ्यासक म्हणून नक्कीच मला हत्तीसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात लोकांनी उभं राहणं सकारात्मक वाटलं. जंगलाजवळ असलेल्या शेतात वन्यजीव येऊ नयेत म्हणून त्यांना पळवून लावण्याकरिता फटाक्यांचा होत असलेला वापर हा सर्वश्रुत होता. पण त्याने शेतावरती वन्यजीवांचं अन्नासाठी होणारं अतिक्रमण काही थांबत नव्हतं. यासाठी वनविभागानेदेखील खूप प्रयत्न केले. जेव्हा नुकसान वाढत गेलं तेव्हा ब्लास्टिंगचा पर्याय वापरायला लोकांनी सुरुवात केली. २०१३ ला हत्ती अभ्यासादरम्यान जुन्या कोडणाड एलिफंट सेंटरमागे असलेल्या नदीमध्ये मासेमारीसाठी ब्लास्टिंग वापरत असल्याचं मी पहिल्यांदाच बघितलं.

त्यावेळी तिथल्या अधिकाऱ्यांसमोर मी याविषयी तक्रार केल्यानंतर, किमान मी तिथे असताना एकदाही मला परत ब्लास्टिंगचा आवाज आला नाही. पण हत्तिणीच्या झालेल्या मृत्यूनंतर शेतकरी ब्लास्टिंगचा पर्याय परत वापरत असल्याचं लक्षात आलं. सुरुवातीला अननसात ब्लास्टिंग भरून ते खाल्ल्याने हत्तिणीचा मृत्यू झाला असं समजलं. नंतर चौकशीअंती अननसाऐवजी नारळाचा उपयोग केला गेला असं पुढे आलं. त्यात रानडुकरांना शेतापासून लांब ठेवण्यासाठी हा पर्याय वापरत असल्याचंदेखील वापरकर्त्यानं चौकशीत सांगितलं. दुर्दैवाने हत्तिणीने तिथे येऊन तो नारळ खाल्ला आणि त्यात तिचा मृत्यू झाला. यामध्ये महत्त्वाची गोष्ट ही आहे की, हत्ती असो वा रानडुक्कर कोणाही जीवाकरिता हा पर्याय वापरणं अयोग्यच आहे. असं

करण्यामागची माणसाची मानसिकता आणि प्राण्याची मानसिकता या दोन्ही गोष्टी आपण बघायला हव्यात. अशाप्रकारे बॉम्बचा उपयोग करून माणूस प्राण्यांना आपल्या शेतापासून लांब ठेवण्याचा प्रयत्न करतो. दुर्दैवाने प्राणी माणसाच्या शेतात आला आणि अशा बॉम्बचा भक्ष्य ठरला तर तो प्राणी मरतो किंवा जखमी अवस्थेत आपल्या कळपाबरोबर राहतो. त्याची तशी भयंकर अवस्था बघता कळप परत त्या शेताच्या दिशेने यायचं टाळतो.

जेव्हा तो फ्रुट बॉम्ब तोंडात फुटला त्यावेळी त्या हत्तिणीला नदीच्या दिशेने जाताना मानवी संपत्तीची नासधूस करत जाणं सहज शक्य होतं. पण असं काहीही न करता पाण्याच्या अथवा नदीच्या शोधात असलेली ती हत्तीण सरळ त्याच दिशेला निघून गेली. ती हत्तीण सायलेंट व्हॅलीमधून आली होती. जर या गोष्टीचा आपण विचार केला तर प्रथम लक्षात येणारी गोष्ट म्हणजे कदाचित ती तिच्या कॉरिडॉरमधूनच आली असेल. जंगल परिसरामध्ये हत्तीचे कॉरिडॉर असतात. हत्ती सहसा आपले कॉरिडॉर सोडत नाहीत. दुर्दैवाने कालांतराने तिथे मानवी वस्त्या तयार होतात किंवा त्या जमिनीवर कागदोपत्री मालकी अधिकार असल्यामुळे माणूस ती जमीन शेतीकरिता वापरतो. बऱ्याच मोठ्या काळानंतर हत्ती जर त्या परिसरात पुन्हा येत असेल तर मानवाकडून झालेल्या या बदलांबद्दल हत्ती अनभिज्ञ असतो. हत्तीबद्दल अभ्यास करताना आपल्याला हत्तींच्या काही गोष्टी माहीत असणं अतिशय गरजेचं असतं. त्यामुळे घडलेल्या घटना परत घडू नये यासाठी आपल्याला काही पर्याय सुचवता येतात. हत्तींच्या दोन गोष्टी या त्यादृष्टीने महत्त्वाच्या आहेत. हत्तींच्या ज्या परिसराचा तुम्ही अभ्यास करताय, त्या परिसरात हत्तींसंदर्भातील ऐतिहासिक नोंदींचादेखील तुम्हाला अभ्यास करावा लागतो. या परिसरात पूर्वी हत्ती होते का? असल्यास साधारण किती वर्षांपूर्वी होते? त्यावेळी घडलेल्या काही घटनांच्या नोंदी आहेत का? हत्तींना आनुवंशिक स्मृती (genetic memory) असतात. त्यामुळे एखाद्या परिसरात जरी हत्ती नसला तरी कालांतराने हत्ती त्या परिसरात आल्याचे आपल्याला लक्षात येते. हे आनुवंशिक स्मृतीमुळे घडते. उदाहरणादाखल सांगायचं झालं तर माझे पणजोबा हे मुंबईहून पुण्याला गेले तेव्हा येण्याजाण्याचा रस्ता त्यांच्या स्मृतीमध्ये कोरला गेला. पणजोबांकडून तो स्मृतीत कोरला गेलेला रस्ता पुढच्या पिढीकडे गेला. त्यानंतरच्या पिढीतदेखील कोणीही पुण्याला गेलं नाही पण स्मृतीतून तो रस्ता पुढच्या पिढीकडे संक्रमित होऊन गेला. चौथ्या पिढीत असलेल्या माझ्याकडे जेव्हा या स्मृती येतात, तेव्हा मधल्या दोन पिढ्या पुण्याला न जाता पुण्याला जाण्याचा रस्ता मला माहीत असतो. अगदी कोणालाही न विचारता मी पुण्याला सहज पोहोचू शकतो. हेच हत्तींच्या बाबतीत होते. हत्तींचे स्वतःचे कॉरिडॉरदेखील असतात. जेव्हा ती हत्तीण सायलेंट व्हॅलीमधून त्या शेताच्या दिशेने आली त्याअर्थी तो तिचा कॉरिडॉर आहे का? बराच काळ तिथे हत्ती नसेल तर यापूर्वी हत्ती येऊन गेला आहे का? हे बघणेदेखील गरजेचे आहे.

हत्तीचा अभ्यास करताना इतिहासाचा अभ्यास करणं तितकंच महत्त्वाचं आहे. कोकणात अभ्यास करत असताना ती गोष्ट प्रकर्षाने लक्षात आली. कोकणात जिथे जिथे गेलो होतो त्या ठिकाणी लोकांनी आम्हाला सांगितलं की गेल्या शंभर वर्षांत या परिसरात आम्ही हत्ती बघितला नाही. त्यामुळे या परिसराचा हत्ती हा भाग नसतानादेखील हत्ती इथे कसा आला? अभ्यासाअंती इतिहासामध्ये याचे उत्तर सापडले. राजापूरला असलेल्या कातळ शिल्पांमध्ये हत्तींची शिल्पे आपल्याला सापडतात. तसेच महाभारतात उल्लेख आलेला अपरांत भाग म्हणजे आपला कोकण प्रांत होय. त्या भागातील हत्ती सुंदर, देखणे व रुबाबदार आहेत, असा उल्लेखदेखील आपल्याला महाभारतात सापडतो. यामध्ये तिसरा आणि महत्त्वाचा भाग म्हणजे हत्तींची मानसिकता होय. जर आपण अधिक खोलवरचा अभ्यास केला तर आपल्याला लक्षात येतं की जोपर्यंत मानवाकडून हत्तीला त्रास झाला नाही तोपर्यंत हत्तीने मानवालादेखील त्रास दिलेला नाही. जेव्हा जेव्हा हत्तींकडून हल्ला झाला तेव्हा तेव्हा त्या हल्ल्यांमागे स्वसंरक्षणाची गरज जास्त होती.

वरच्या तीनही गोष्टी लक्षात घेतल्या तर आपल्या सहज ही गोष्ट ध्यानात येईल की सायलेंट व्हॅलीमधून आपला कॉरिडॉर समजून आलेली किंवा कॉरिडॉरमधून आलेली हत्तीण ही मानवी दोषांमुळे मारली गेली आहे. त्या हत्तिणीचं वय १५ वर्षे होतं आणि ती गरोदर होती. कदाचित ती पहिल्यांदाच गरोदर होती. हत्तीण नेहमी कळपातच राहते आणि एवढी तरुण हत्तीण ही नक्कीच कुठल्यातरी कळपाचा भाग असणार. खाण्याच्या नादात ती कळपापासून थोडी लांब आली असणार. त्यात झालेल्या ब्लास्टिंगच्या आवाजाने कळप कदाचित विरुद्ध दिशेला निघून गेला असेल. अशा क्षणी ती कळपाची गरज असतानादेखील एकटी पडली असेल. तिथे पहिल्यांदा मनातून खचली असेल. ब्लास्टिंगमुळे झालेल्या जखमा आणि तोंडाचा होणारा दाह या दोन गोष्टींमुळे कळप शोधण्याऐवजी पाण्याच्या दिशेने जाण्याव्यतिरिक्त दुसरा कुठलाही उपाय तिला उरला नाही. जर आपण टीव्हीवरची क्लिप बघितली असेल तर आपल्याला हे नक्की लक्षात येईल की हत्तिणीने पाण्यातून तोंड वर काढलं नव्हतं. तोंडात झालेल्या ब्लास्टमुळे हत्तिणीचे छोटे सुळेदेखील तुटले असावेत आणि तिच्या तोंडात भयंकर जखमा झाल्या. या दोन कारणांमुळे तिला तोंडही नीट बंद करता आले नाही आणि पाणी सतत तिच्या पोटात गेले. आपण गरोदर आहोत हे माहीत असल्यामुळे आता आपल्या पोटातल्या बाळाचंदेखील काही खरं नाही, याचा अंदाज नक्कीच तिला आला असेल. या सगळ्या कारणांमुळे ती मनातून बऱ्यापैकी ढासळत गेली. अशात वनखात्याच्या हत्तींनी तिला बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू केले. मानव प्रशिक्षित हत्ती इतर हत्तींना बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करतात त्यावेळी ते मागून धक्का देतात. हा धक्का त्या हत्तिणीला किंवा हत्तीला अपमानकारक वाटत असतो. कर्नाटकातील सिद्धा हत्ती आणि एलिफंट सेंटरमधील इंद्रजीत हत्ती या दोघांच्यावेळी हा अनुभव प्रकर्षाने आला. एक तर शरीराच्या जखमा, त्यानंतर अशा पद्धतीने दिलेला धक्का या दोन गोष्टी हत्तिणीबाबतीत मनाविरुद्ध घडल्या.

वाईट शारीरिक अवस्था आणि समोर असलेल्या माणूसप्राण्यावर विश्वास टाकावा की टाकू नये ही मानसिक स्थिती, न दिसणारा आपला कळप, बाळाच्या बाबतीत होणारी मनाची घालमेल आणि कमी होत जाणारी ताकद या सगळ्या कारणांचा आणि घटनाक्रमाचा अपरिहार्य शेवट म्हणजे त्या मातेने घेतलेली जलसमाधी होय.

अर्थात, माणसाच्या कृतीमुळे घ्यावी लागलेली जलसमाधी... !